# मधमाश्यांचे कीटकनाशकांपासून संरक्षण करण्यासाठी सर्वोत्तम व्यवस्थापन पद्धती

**डॉ. अमोल हरणे**
विषय विशेषज्ञ (पिक संरक्षण)

**श्री. तुषार मेश्राम**
विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार)

कृषि विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूर

• निरोगी पिके राखण्यासाठी आणि कीटकनाशकांचा वापर कमी करण्यासाठी एकात्मिक कीड नियंत्रण पद्धतीचा अवलंब करुन जैविक नियंत्रणाला महत्व द्यावे. सावधगिरीसाठी नैसर्गिक शत्रू आणि परागकणांचे संरक्षण करावे.




• फुलोऱ्या अवस्थेत आंतरप्रवाही कीटकनाशक तसेच कोळीनाशक (ॲकेरिसाइड) वापरू नका. "मधमाशांसाठी अत्यंत विषारी" तसेच "मधमाशांसाठी विषारी" असे लेबलवर लिहिलेले अशी कीटकनाशकांचा वापर टाळावा. फवारणी सकाळी नऊच्या आधी किवा सायंकाळी चार नंतर करावी.

• कीटकनाशकांचा वापर करताना लेबल काळजीपूर्वक वाचा आणि उत्पादनाच्या दिशानिर्देशांचे अनुसरण करून त्याचे पालन करा.

• भुकटीरूप कीटकनाशकांचा वापर करू नये. त्याऐवजी दानेदार कीटकनाशके जमिनीत वापरुन मधमाशांचा संपर्क टाळता येतो.

• बिजप्रक्रिया केल्यामुळे सुरवातीच्या अवस्थेत कीटकनाशकांचा वापर टाळता येतो.

• शेतात मधमाश्यांच्या पेट्या ठेवल्या असल्यास कीटकनाशके फवारताना पेटीचा दरवाजा आदल्या दिवशी सायंकाळी बंद करावा. तसेच पर्यायी खाद्याची व्यवस्था करावी.

• जेथे झाडे फुलत असतील तेथे वापरण्यासाठी कीटकनाशके किंवा कोळीनाशक (माइटिसाइड्स) बुरशीनाशकांसोबत मिसळू नका.

• फुलोऱ्याच्या दरम्यान किंवा शेतात जास्त मधमाशी क्रियाशील असताना, कीटकनाशक व बुरशीनाशकमध्ये वापरताना चिकट पदार्थ (स्टिकर) टाकू नका.

• मधमाशांच्या समुहावर कोणत्याही कीटकनाशकाची थेट फवारणी करू नका. त्याचप्रमाणे कीटकनाशक फवारणीपूर्वी पाण्याचे स्त्रोत झाकून टाका किंवा फवारणी केल्यानंतर नवीन, स्वच्छ पाणी भरा.

• कीटकनाशकांचा मधमाशांची संपर्क रोखण्यासाठी ठिंबक सिंचन (केमिगेशन ड्रिप) ही सर्वोत्तम पाणी व्यवस्थापन पद्धती वापरा.

• ज्या फुलांपासून मधमाशा मध गोळा करतात ती फुले स्वस्थ आणि कीटकनाशकांच्या अंशापासून मुक्त असली पाहिजे.

• विशिष्ट कीटकनाशके वापरताना मधमाशांचे संरक्षण कसे करावे हे जाणून घेण्यासाठी कृषि तज्ञांचा सल्ला घ्या. स्थानिक पातळीवर कोणत्या प्रकारच्या मधमाश्या उपस्थित आहेत आणि स्थानिक सहकारी विस्तार कार्यालयाशी संपर्क साधून उत्पादन कसे वाढवू शकते हे जाणून घ्या.

### कृत्रिम कीटकनाशकांना पर्यायी जैविक कीटकनाशके:

| अ. क्र. | कीड व रोग | कृत्रिम कीटकनाशके/ बुरशीनाशके | जैविक कीटकनाशके/ बुरशीनाशके |
|---|---|---|---|
| १) | रसशोषक किडी – मावा, तुडतुडे, पांढरी माशी, फुलकिडे | थायोमिथोक्झोम<br>इमिडाक्लोप्रीड<br>असिटामाप्रिड | व्हर्टीसिलीयम, मेटॅरिझम |
| २) | उंट अळी, केसाळ अळी | क्युनॉलफॉस<br>लॅमडा<br>सायलोहेथ्रिन<br>इमामेक्टिन<br>बेंन्झोयट<br>क्लोरीनायट्रोपोल | निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, नोम्युरीया |
| ३) | बोंडअळी | सायपरमेथरीन<br>डेल्टामेथरीन<br>लॅमडा<br>सायलोहेथ्रिन | एचएएनपीवी, बिव्हेरीया, नोम्युरीया, मेटॅरिझम |
| ४) | तंबाकूची पाने खणारी अळी | स्पीनोसॅड | एसएनपीवी, बिव्हेरीया |
| ५) | मररोग, मुळकुज, डिंक्या | कार्बेंडेजिम<br>मेटाल्याक्सिल<br>फोसिटील<br>अल्युमिनिम | ट्रायकोडर्मा विरिडी, ट्रायकोडर्मा हर्जियनाम, बॅसीलस सबटुलीस, स्युडोमोनस फ्लूरोसेंन्स |

(संपर्क: +९१ )

★ ★ ★